कौटुंबिक न्यायालय आता सीबीएसला

नाशिकरोड येथून स्थलांतराच्या ठरावास बार असोसिएशनची मंजुरी

नाशिक । प्रतिनिधी

नाशिकरोड येथील कौटुंबिक न्यायालय नाशिक जिल्हा व सत्र न्यायालयाच्या आवारात स्थलांतरित केले जाणार आहे. त्याबाबतचा ठराव नाशिक बार असोसिएशनच्या सर्व साधारणसभेत सोमवारी (दि. ३१) सर्वानुमते मंजूर करण्यात आला आहे.

नाशिक बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. नितीन ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत अनेक विषयांवर चर्चा झाली. नाशिक बार असोसिएशनचे वार्षिक उत्पन्न वाढल्याने जी. एस. टी. भरावा लागत आहे, त्या अनुषंगाने ठराव पारीत करण्यात आले. नाशिकरोड येथे तात्पुरत्या स्वरुपातील कौटुंबिक न्यायालय हे नाशिक जिल्हा न्यायालय आवारातील इमारतीमध्ये स्थलांतरीत करण्यात यावे, याकरिता नाशिक बार असोसिएशनने आवश्यक ते सर्व प्रयत्न करावे, असा ठराव एकमताने मंजूर करण्यात आला व कौटुंबिक न्यायालय नाशिक जिल्हा न्यायालय आवारात लवकरच स्थलांतरीत होईल, असा विश्वास ॲड. ठाकरे यांनी व्यक्त केला.

सूत्रसंचलन सहसचिव ॲड. संजय गिते यांनी केले तर उपाध्यक्ष ॲड. वैभव शेटे व सभेप्रसंगी ॲड. संतोष गटकळ, ॲड. नंदकीशोर लाहोटी, ॲड. जालिंदर ताडगे यांनी सूचना केल्या. सभेस सहसचिव ॲड. सोनल गायकर, खजिनदार ॲड. कमलेश पाळेकर, सदस्य ॲड. शिवाजी शेळके, ॲड. प्रतीक शिंदे, ॲड. महेश यादव, ॲड. अश्विनी गवते व ॲड. वैभव घुमरे आदी उपस्थित होते.

वकिलांचा सन्मान

ॲड. सुनील बोराडे यांची अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषद, पुणे या संस्थेच्या नियामक मंडळावर, ॲड. सोमनाथ घोटेकर यांची श्री. संत निवृत्ततनाथ समाधी संस्थानच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल आणि ॲड. पांडुरंग तिदमे यांची नाशिक जिल्हा वकील सोसायटीच्या चेअरमनपदी तसेच ॲड. भानुदास शौचे यांची उपाध्यक्षपदी आणि ॲड. भरत ठाकरे यांची सचिवपदी निवड झाल्याबद्दल तसेच ॲड. प्रवीण अमृतकर यांची उन्नती एज्युकेशन सोसायटीच्या सचिवपदी निवड झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला.

आ. सीमा हिरे यांच्या निधीतून विविध कामांचे लोकार्पण

सातपूर । प्रतिनिधी

नाशिक पश्चिमच्या आ. सीमा हिरे यांच्या आमदार निधीतून संदीप नगर येथील महालक्ष्मी मंदिराच्या वॉल कंपाउंडचे लोकार्पण, तिडके लेआउट लाहोटीनगर व जाधव संकुल येथील वॉल कंपाऊंडचे उद्घाटन तसेच तुळजाभवानी माता मंदिराच्या ५० लाख रुपयांच्या भव्य डोम अशा विविध कोट्यवधी रुपयांच्या भूमिपूजनाचा सोहळा पार पडला.

याप्रसंगी संदीप नगर महालक्ष्मी मंदिराला वॉल कंपाऊंड, तिडके लेआउट लाहोटी नगर येथे ओपन स्पेससाठी वॉल कंपाऊंड व पेव्हर ब्लॉक तसेच जाधव संकुल येथे वॉल कंपाऊंडचे लोकार्पण करण्यात आले.

मतदारसंघात विविध विकासकामे, डोम, रस्ते, सभा मंडप, आणि केबल अंडरग्राउंडसह अनेक प्रकल्प जलदगतीने सुरू आहेत. या सोहळ्याला भाजप ज्येष्ठ नेते महेश हिरे, रामही संभेराव, भगवान काकड, राजेश दराडे, माजी नगरसेवक मधुकर जाधव, माजी नगरसेविका माधुरी बोलकर, हेमलता कांडेकर, युवा मोर्चा अध्यक्ष गौरव बोडके, शिवाजी शहाणे, मंदाकिनी नाईकवाडे, रश्मी हिरे (बेंडाळे), रवींद्र जोशी, गणेश बोलकर, यांसह संदीप नगर, लाहोटी नगर व जाधव संकुल येथील नागरिक आणि महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जि. प. नवीन प्रशासकीय इमारतीची मित्तलांकडून पाहणी

नाशिक । प्रतिनिधी

जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल यांनी जिल्हा परिषदेच्या नवीन प्रशासकीय इमारतीच्या कामाची पाहणी केली. या पाहणी दरम्यान, इमारत व दळणवळण विभाग क्र. १ चे कार्यकारी अभियंता संदीप सोनवणे, वास्तुविशारद तसेच संबंधित बांधकाम ठेकेदार उपस्थित होते.

नवीन इमारतीच्या बांधकाम पाहणी प्रसंगी मित्तल यांनी कामाच्या प्रगतीचा आढावा घेत त्यांनी पहिल्या तीन मजल्यांचे फर्निचरचे काम तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या. तसेच, इमारतीच्या बाहेरील रस्ते आणि परिसराच्या सुशोभीकरणाच्या कामांना देखील गती देऊन पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या. नवीन इमारत पर्यावरणपूरक व्हावी, यासाठी इंडियन ग्रीन बिल्डिंग कौन्सिलच्या मानकांनुसार इमारतीचे काम पूर्ण करून त्याची आयजीबीसीमध्ये नोंदणी करण्याबाबत त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले. यासोबतच, नवीन प्रशासकीय इमारतीतील प्रशस्त सभागृहाच्या ध्वनीव्यवस्थेचीही तपासणी करण्यात आली. सभागृहात आवाज घुमू नये, यासाठी कोणत्या प्रकारचे बांधकाम आणि साहित्य वापरावे, याबाबत तज्ञांकडून मार्गदर्शन घेण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून सभागृहातील ध्वनीव्यवस्था अधिक प्रभावी करण्यासाठी उपाययोजना करण्यात याव्यात, अशा सूचना यावेळी मित्तल यांनी केल्या.

नवीन अग्निशामक दल इमारतीचे उद्घाटन

नवीन नाशिक । प्रतिनिधी

गुढीपाडव्याच्या मुहुर्तावर स्टेट बँक चौक, नवीन नाशिक येथे नवीन अग्निशमक दलाच्या इमारतीचे उद्घाटन मुख्य अग्निशमन अधिकारी संजय बैरागी यांच्या हस्ते करण्यात आले. या नव्या सुविधेमुळे परिसरातील नागरिकांना अधिक सुरक्षितता मिळणार असून, आपत्कालीन परिस्थितीत जलद मदत उपलब्ध होईल.

या नवीन अग्निशामक केंद्रात सध्या तीन अग्निशमन बंब उपलब्ध असणार आहेत. यामध्ये एक बाउजर, एक वॉटर टेंडर आणि एक वॉटर मिक्स टेंडर समाविष्ट आहे. हे सर्व अत्याधुनिक उपकरणांनी सुसज्ज असून, आग लागल्यास तातडीने प्रतिसाद देता येईल.

उद्घाटन सोहळ्यास अनेक मान्यवर आणि स्थानिक नागरिक उपस्थित होते. केंद्रप्रमुख प्रमोद लहामगे यांच्या नेतृत्वाखालील या अग्निशमन दलात प्रशिक्षित अग्निशमन कर्मचारी आणि स्वयंसेवक कार्यरत आहेत. यामध्ये तेजस वाघ, प्रसाद खैरनार, शंतनु जोशी, तुषार पाटील, सुमित काटे, शुभम शेवाळे, ऋतिक शेलुकर, यश सोनवणे, अर्जिक्य वझरे, पाच शिंदे आणि पंकज सिंधीकर यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले.

नवीन नाशिक परिसर झपाट्याने विकसित होत असून, वाढत्या नागरी वसाहतींना सुरक्षितेच्या दृष्टीने हे अग्निशमक केंद्र मोठी मदत करणार आहे. मुख्य अग्निशमन अधिकारी संजय बैरागी यांनी आपल्या भाषणात या नव्या केंद्राच्या महत्त्वावर प्रकाश टाकला. त्यांनी कर्मचाऱ्यांना जबाबदारीने आणि तत्परतेने काम करण्याचे आवाहन केले. स्थानिक नागरिकांनीही या सुविधेचे स्वागत करत भविष्यात अधिक सुरक्षितता

कुंभमेळ्याच्या अनुषंगाने बाहेरील बंब नाशिक अग्निशामक दलास मदतीकरता येणार आहे.

नवीन नाशिकसारख्या भागात अग्निशामक दल होणे हे जरुरी होते. त्याकरिता एक अद्ययावत असा अग्निशामक दल नागरिकांच्या सेवेसाठी तत्पर सेवा देण्याकरिता उघडण्यात आला आहे. सर्वांचे सहकार्याने आम्ही अशीच सेवा देत राहू.

- प्रमोद लहामगे, केंद्रप्रमुख

मिळेल, असा विश्वास व्यक्त केला. या नवीन अग्निशामक दलाच्या स्थापनेमुळे नवीन नाशिक परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार असून, आपत्ती व्यवस्थापन अधिक प्रभावी होईल.

प्रभाग ३ मधील भाजप बूथ प्रमुखांची निवड

पंचवटी । नवीन आडगाव नाका येथे भाजप प्रभाग क्रमांक ३ मधील बूथ नंबर १५६ ते १५९ च्या बूथप्रमुखांची बैठकीत निवड करण्यात आली.

निवडणूक प्रक्रिया निवडणूक प्रमुख दिगंबर धुमाळ, सरचिटणीस महेश महांकाळे, युवराज झोमान यांच्या उपस्थितीत झाली.

भारतीय जनता पक्षाच्या वतीने देशभरात संघटनात्मक निवडून कार्यक्रम सुरू आहेत. त्याचाच एक भाग म्हणजे बूथ प्रमुखांची निवड करण्यात आली. बूथ क्रमांक:- १५६- संपत लहामगे, बूथ क्रमांक :- १५७- महेश कापडे, बूथ क्रमांक :- १५८- सोमनाथ बोडके, बूथ क्रमांक :- १५९ -गायत्री पाठक यांची बूथ प्रमुखपदी निवड करण्यात आली आहे. बैठकीचे आयोजन सोमनाथ बोडके यांनी केले.

यावेळी मंगेश काठे, जयवंत बागुल, जितेंद्र महाजन, रमेश कराड, दिनेश कापडे, बाळासाहेब भवर, रोहित रत्नांनी, विवेक सिंग, भाऊसाहेब बर्वे, सागर भगत, विशाल पवार आदींसह कार्यकर्ते उपस्थित होते.

दोन महिलांचा मृत्यू

नाशिक । दुचाकीवरून पडल्याने वेगवेगळ्या भागातील दोन महिलांचा मृत्यू झाला आहे. त्यातील एक वृध्द महिला नातूसमवेत प्रवास करीत होती. त्याप्रकरणी मुंबईनाका व म्हसरूळ पोलीस ठाण्यात मृत्यूची नोंदी करण्यात आली आहे.

भाभानगर येथील संगीता संजय जोशी (५८) या दहा दिवसांपूर्वी सोसायटीच्या आवारात मोपेडवरून पडल्या. त्या घटनेत खुब्यास गंभीर दुखापत झाल्याने त्यांच्यावर शस्त्रक्रिया करण्यात आली. शनिवारी (दि. २९) मध्यरात्री त्यांनी झोपेत कुठलीही हालचाल न केल्याने कुटुंबीयांनी त्यांना जिल्हा रूग्णालयात दाखल केले. त्यावेळी वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्यांना मृत घोषित केले. मुंबईनाका पोलिसांत मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

यासह शहीद चित्ते पुलाजवळ झालेल्या अपघातात हिराबाई लक्ष्मण तांदळे (७४ रा. पेठरोड) यांचा मृत्यू झाला. तांदळे गुरूवारी (दि. २०) सायंकाळी नातू रोहन तांदळे याच्या दुचाकीवरून प्रवास करीत होत्या. गंगापूररोडलवरु दोघेही शहीद चित्ते पुलाकडे जात असताना हिराबाई तांदळे या धावत्या दुचाकीवरून तोल जावून खाली पडल्या. त्यांना खासगी रुग्णालयात दाखल केल्यावर रविवारी (दि. ३०) पुन्हा जिल्हा रूग्णालयात दाखल केले. त्यावेळी वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्यांना तपासून मृत घोषित केले. म्हसरूळ पोलीस तपास करत आहेत.

सात ते नऊ वाजेदरम्यान सोनसाखळीचोरी

महिलावर्गात भितीचे वातावरण; दोन लाखांचे दागिने पळवले

नाशिक । प्रतिनिधी

नाशिक शहरात पुन्हा एकदा भिवंडी, नाशिक, श्रीरामपूर व आंबिवलीतून आलेल्या सराईत चेनस्नॅचर्सने नाशिककर महिलांच्या उरात धडकी भरवली आहे. दुचाकी आणि पायी आलेल्या या चोरट्यांनी रस्त्याने जाणाऱ्या तीन महिलांच्या गळ्यातील एकूण दोन लाख नऊ हजार रुपयांच्या सोनसाखळ्या रविवारी(दि.३०) ओरबाडून नेल्या आहेत. विशेष म्हणजे जबरी चोरीच्या या घटना वेगवेगळ्या भागांत घडल्या असून, चोरट्यांनी हे गुन्हे करण्यासाठी सायंकाळी सात ते रात्री सव्वा नऊच्या दरम्यानची वेळ निवडल्याचे समोर आले आहे. दरम्यान, विविध सीसीटीव्ही फुटेजनुसार संशयितांचा माग काढाला जात आहे.

चेनस्नॅचिंगची पहिली घटना, गंगापूर रोडवरील शांतिनिकेतन चौकात शनिवारी (दि. २९) रात्री सव्वा सातच्या सुमारास घडली. कविता राजीव आबड (वय ५३, रा. ऋषिराज हेरायझन, शांतीनिकेतन चौक, गंगापूर रोड) यांच्या फिर्यादीनुसार, त्या नातवासोबत शांतीनिकेतन चौकातून पायी जात होत्या. येथील अपोलो मेडिकलसमोर आल्या असताना दुचाकीवरून आलेल्या दोघा संशयितांपैकी एकाने त्यांच्या गळ्यातील ५५ हजारांची सोन्याची पोत जोरात हिसकावून प्रसाद सर्वकल्प्या दिशेने पळ काढला. गंगापूर पोलिसात जबरी चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर, दुसरी घटना इंदिरानगर पोलिसांच्या हद्दीतील राजसारथी सोसायटीजवळील वनसंपदा सोसायटीजवळ (दि. २९) रात्री आठ वाजता घडली. गोकर्णा वैजिनाथ कदम (२७, रा. राजसारथी सोसायटी, इंदिरानगर) यांच्या फिर्यादिनुसार, लहान मुलगा व सासू यांच्यासह त्या पायी जात असताना वनसंपदा सोसायटीजवळील गार्डनच्या चौफुलीवर आले. त्याचवेळी समोरून भरधाव वेगात आलेल्या दुचाकीवरील दोघांपैकी पाठीमागे बसलेल्या चोरट्याने गोकर्णा यांच्या गळ्यातील ६० हजारांचे सोन्याचे मंगळसूत्र ओरबाडून रथचक्रसोसायटीच्या दिशेने पळ काढला. इंदिरानगर पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे. यानंतर तिसरी घटना पंचवटीतील दंत महाविद्यालयसमोर(दि. २९) रात्री सव्वा नऊच्या सुमारास घडली. मनीषा दिलीप पवार (५०, रा. ओसीओ बंगला, केवडीबन, तपोवन) यांच्या फिर्यादीनुसार, त्या आई विमल सांगलीकर यांच्या समवेत स्वामीनारायण मंदिरातून दर्शन घेऊन घराकडे पायी जात होत्या. पंचवटी दंत महाविद्यालयाजवळील विव्हियाना सोसायटीजवळील सर्व्हिसरोडवरुन जातानाच त्यांच्या पाठीमागून २५ वर्षीय संशयित चोरटा आला. त्याने मनिषा यांच्या आईच्या गळ्यातील ९४ हजार ५०० रुपयांची सोन्याची पोत व चेन जबरीने हिसकावून कन्नमवार पुलाखाली दुचाकी घेऊन थांबलेल्या साथीदारासमवेत पळ काढला. त्यानंतर दोघे दुचाकीवरून अमरधाम्च्या दिशेने पसार झाले. आडगाव पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे.

ठळक मुद्दे

- सराईत पुन्हा सक्रिय
- २६ ते ५५ वयोगटातील विवाहित महिला लक्ष्य
- चोरीसाठी सीसीटीव्ही नसलेल्या परिसरात रेकी
- दुचाकी व मोपेड बाईकचा चोरट्यांकडून वापर
- वाहनांना नंबर नाही, काही वाहनांचे नंबर अंधूक
- सीसीटीव्ही फुटेजची पडताळणी
- महिलांनी दक्षता बाळगण्याचे आवाहन
- चोरट्यांना पकडण्याचे पोलिसांसमोर आव्हान

वाहनांची चोरी

नाशिक । शहरातून वाहनांची चोरी होण्याचे प्रमाण वाढतच आहे. आडगाव शिवारातील कोणार्कनगर येथून दुचाकी वाहनाची चोरी करण्यात आली. जान्हवी शरद गायकवाड (२१, रा. वैष्णवी पार्क अपार्टमेंट, कोणार्कनगर) यांची २० हजारांची मोपेड १३ मार्चच्या मध्यरात्री अपार्टमेंटच्या पार्किंगमधून चोरट्याने चोरून नेली. आडगाव पोलिसात गुन्हा दाखल आहे. तर, संदीप रघुनाथ कोरडे (४०, रा. भोरमळा, सामनगाव रोड) यांची ७० हजारांची दुचाकी शनिवारी (दि. २९) दुपारी साडेबारा ते पाऊण या वेळेत पंचवटी बस डेपोसमोरील झुडीओ शोरूमच्या भिंतीलगत पार्क असताना चोरट्याने चोरून नेली. पंचवटी पोलिसात गुन्हा दाखल आहे. सतिश गुलाबराव भदाणे (४२, रा. स्वस्तिक निवास, प्रमोदनगर, गंगापूर रोड) यांची १० हजारांची दुचाकी १८ मार्च रोजी दुपारी अडीच तेतीन या दरम्यान गंगापूर रोडच्या नेर्लेकर चौकातील वाईनशॉपसमोरून चोरट्याने चोरून नेली. गंगापूर पोलिसात गुन्हा दाखल आहे.

निधन वार्ता...

अलका कुलकर्णी

नाशिक । सावतानगर सिडको येथील रहिवासी अलका मनोहर कुलकर्णी (६१) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, दोन मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे. टॉक ऑफ दि टाउन ट्रॅव्हल्सचे आप्पा कुलकर्णी यांच्या त्या पत्नी होत.

सुरेश बने

नाशिकरोड । नाशिकरोड येथील माजी प्रेस कामगार सुरेश विठ्ठल बने (७८) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. जेलरोड येथील श्री गणेश एकता क्रीडा मंडळाचे अध्यक्ष तथा बांधकाम व्यावसायिक अजित बने यांचे ते वडील होत.

क्लासिफाईड/सुपरमार्केट

पाहिजेत

हॉटेल कामासाठी वेटर १०वी पास मुले-मुली पाहिजे. नाशिकमधील रहिवासी असावे. मोबा. 8669147669.
(31/03-CM-413)

प्लॉट/फ्लॅट

पाथर्डी शिवारामध्ये सर्व्हे नं. २९७ सेल्सटॅक्स ऑफीसच्या बाजूला बंगलो उपयुक्त १३८ वाराचा प्लॉट त्वरित विकणे आहे. संपर्क - मुकुंद राठी - 9860610745.
(02/04-CM-448)

खरेदी/विक्री

त्र्यंबकेश्वर अंबोली हायवेटच २० गुंठे जमीन देणे. ब्राम्हणवाडे - २७ गुंठे, ब्राम्हणवाडे - २ एकर, बेझे धरणाजवळ ४६ गुंठे. सर्व डांबरीरोडच. मो. 9405366418.
(02/04-CM-447)

दारुबंदीचा गुरुमंत्र

द ग्रेट साईंटिस्ट... (best doctor & gold medal awarded) डॉ.पालवे ॲडमिट करा... ।। नका करू... पेशंटला सांगा...।। नका सांगू... पेशंटला आणा... ।। नका आणू... * व्यसन पेशंटचे... विश्वास तुमचा... उपचार आमचे... Lifelong व्यसनापासून १०० टक्के मुक्ती... सर्व सुविधांनी परिपूर्ण : * व्यसनमुक्ती Special पंक्ष, मेडिसीन, इंजक्शन स्प्रे, ड्रॉप, ऑपरेशन, गोळी टाकणे, मंत्रोपच्चार... ॲडमिट सुविधा... * (विशेष) गरिबांसाठी फीमध्ये सवलत... तर संपर्क : 9552619752. डॉ.पालवे नशामुक्ती केंद्र, वरणगाव. (09/01/26)
(CRINV-23-24JL/CRG00555)

व्यसनमुक्ती

गॅरंटीने सोडवा. दारू + गुटखा + सिगारेट + बिडी + मावा + तंबाखू + बार + खैनी + भांग + गांजा + अफिम + जर्दा + ताडी + स्नेकबाईट + व्हाईट पावडर + व्हाईटनर + हिरॉईन + चरस + कोबेन + एमडी + एल.एस.डी. डॉट फेयर + झोपेची गोळी + इंजेक्शन... डॉ.पालवे नशामुक्ती केंद्र, वरणगाव. मो. 9552619752. www.drpalvenasha muktikendra.in, १००% रिझल्ट. (09/01/26)
(CRINV-23-24JL CRG00554)

सर्व आजारांसाठी

जुनाट सर्दी, जुनाट दमा, जुनाट गुडघेदुखी, चालता, बसता, उठता न येणे, जुनाट संधीवात/चिकन गुनिया, जुनाट अॅलर्जी, जुनाट अर्धशिशी, जुनाट मूळव्याध, एचआयव्ही, भूक लागत नाही? वजन कमी? थकवा जाणवतोय?, Low CD4 Count? उपचार सर्वांसाठी, सर्व आजारांसाठी. भेटा- अहमदनगरचे सुप्रसिद्ध डॉक्टर पालवे, वरणगाव. मो.नं. 9552619752.
(09/01/26)
(CRINV-23-24JL/CRG00556)

वर पाहिजे

गरीब कुटूंबातील मुलगी वय - २७, शिक्षण - १२वी, दवाखान्यात नर्स म्हणून काम करते. वेतन - १२,०००/- (जात - मराठा) आंतरजातीय चालेल, मुलीला वडील नाही. अपेक्षा - कष्टाळू मुलगा हवा. (त्वरित विवाह).मो. 7058846590.
(29/03-CM-442)

नावात बदल

माझे जुने नाव विरम कपिल जैन असे होते. आता माझे नवीन नाव विरम कपिलकुमार शाह असे झाले आहे. गॅझेट नं.M-24443129

My old name Shweta Rohan Dhavan has been changed to my new name Shweta Bhanuprasad Sevak as per Aadhaar No. 815774698183

My old name Neha Tanveer Patel has been changed to my new name Neha Rafique Shaikh as per document.

नाशिक कृषि उत्पन्न बाजार समिती, नाशिक

मा. सभापती कृषि उत्पन्न बाजार समिती, नाशिक, समितीचे पंचवटी मार्केटयार्ड कार्यालयामध्ये मॉडेलिंगकरण ठेके घेणारी कंपनी B-1 मनुष्यबळाचे निविदा सादरकरणाचे योग्य व्यक्ति नोंदणीकृत कार्यालयीनकृत ठेकेदार यांच्याकडून मागविण्यात आलेले. त्याबाबतचे सविस्तर माहिती.

अ.क्र.	मॉडेलिंगकरणे नाव	मॉडेलिंगचे नाव (अंदाजपत्रक) चोपडून
१	पंचवटी मार्केटयार्ड कार्यालयामध्ये मॉडेलिंगकरण ठेके घेणारी कंपनी	रु. ३,८८,५६४/-

अटी-शर्ती :- १) सोबत निविदा रक्कम रु. १०००/- चा धनादेश दि. ०१/०४/२०२५ पासून ते दि.०४/०४/२०२५ दुपारी १ वाजेपर्यंत समितीचे पंचवटी मार्केट कार्यालयात कार्यालयीन वेळेत सुरीचे विरुद्ध शिक्षण बांधकाम खातेकडे मिळणार.

२) सिलबंद निविदेसोबत रक्कम रु. १०,०००/- चा डी.डी. अगर पे ऑर्डर धनादेश कमाल मुदतीत निविदेसोबत स्वतंत्र पाकिटात जोडावी. सिलबंद निविदा दि.०४/०४/२०२५ वेळी दुपारी १ वाजेपर्यंत कार्यालयात स्वीकारण्यात येतील.

वरील सर्व समितीचे कोणतेही निविदा कोणतेही कारण न देता नामंजूर करण्याचा हक्क. अधिकारसुद्धा ठेवण्यात आले.

(प्रकाश जोशी) सचिव | (विनायक माळेकर) कनिष्ठ अभियंता | (कल्पना पुंडलीक) सभापती

नाशिक कृषि उत्पन्न बाजार समिती, नाशिक-३

वाचकांना विनम्र सूचना

'देशदूत' वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातीतील मजकुराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात, त्याची देशदूत वृत्तपत्र समूह कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पूर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल देशदूत वृत्तपत्र समूहाचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाहीत, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

टीप : बाळाचा फोटो प्रकाशित करण्यासाठी रु. १००/- शुल्क आकारले जाईल.
या सदरात केवळ १ ते ५ वर्षादरम्यानच्या बाळाचेच फोटो प्रकाशित केले जातील.

◆ **जाहिरात विभाग**, दै. देशदूत, एम.जी.रोड, नाशिक. ०२५३- २५७५७१६ ◆**नाशिकरोड** : प्रतिक आर्केड, शॉप नं. २५, देना बँकेच्या वरती, विटको पॉइंट. ०२५३-२४६२७५६ ◆**निफाड** : मार्केट कमेटी, व्यापारी संकुल, बसस्टॅण्डशेजारी, गोदावरी प्रिंटींग प्रेसच्या वरती. ०२५५०-२४११०० ◆**दिंडोरी** : दिंडोरी कृ.उ.बा. समिती कॉम्प्लेक्स, पंचायत समिती गेटसमोर. ०२५५७-२२२८८८ ◆**मालेगाव** : पांजरापोळ शॉपिंग सेंटर, छ.शिवाजी पुतळ्याजवळ. ०२५५४-२४३४६२२ ◆**सिन्नर** : दुसरा मजला, मोतीकमल टॉवर, बसस्थानकासमोर. ०२५५१-२२२१५१. या कार्यालयांमध्ये बाळाचे फोटो स्विकारले जातील.